# बृहन्मुंबई महानगरपालिका

## महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे खाते

## माहितीचा अधिकार अधिनियम - 2005

## नियमपुस्तिका 1 ते 17

# निर्देशसूची

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005** खाली आवश्यक असल्यानुसार महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागाच्या 1 ते 17 नियमपुस्तिका

| अनु. क्र. | नियमपुस्तिका क्र. | तपशील |
|---|---|---|
| 1 | - | प्रस्तावना |
| 2 | 1 | संघटना, कार्य आणि कर्तव्ये यांचे तपशील |
| 3 | 2 | अधिकारी आणि कर्मचारी वर्गाचे अधिकार आणि कर्तव्ये |
| 4 | 3 | पर्यवेक्षण आणि जबाबदारीच्या साधनांसह निर्णय प्रकियेमध्ये अनुसरलेली पध्दती. |
| 5 | 4 | संघटनेने त्यांच्या कार्याबाबत ठरविलेल्या कार्यमुक्तीच्या प्रमाणपध्दती |
| 6 | 5 | संघटनेकडे त्यांना किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा त्यांच्या कर्मचा-यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडण्याकरिता असलेले नियम, विनियम माहिती, नियमावली आणि अभिलेख |
| 7 | 6 | संघटनेकडे त्यांना किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या श्रेणीचे विवरणपत्र |
| 8 | 7 | जनतेच्या सभासदांनी प्रशासनाने आखलेल्या निर्णयाबाबत विचार विनिमय करण्याकरिता किंवा निवेदना संदर्भात त्यांच्याशी चर्चा करण्याकरिता केलेल्या व्यवस्थेचा तपशील |
| 9 | 8 | प्रशासनाच्या मार्गदर्शनासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींची गठित करण्यात आलेली मंडळ, परिषद, समित्या वा इतर मंडळाची विवरणपत्र व त्या मंडळ, परिषदा, समित्या वा इतर मंडळाच्या सभा जनतेसाठी खुल्या आहेत का किंवा त्यांच्या सभेचे इतिवृत्त जनता पाहू शकते का |
| 10 | 9 | अधिकारी आणि कर्मचा-यांची निर्देशिका |
| 11 | 10 | नियमावलीमध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक अधिकारी आणि कर्मचा-यांना मिळत असलेले मासिक वेतन व मोबदला |
| 12 | 11 | प्रत्येक खात्याला दिलेले अर्थसंकल्प व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च आणि संवितरण दर्शविणारा अहवाल |
| 13 | 12 | वाटप केलेल्या रकमांसह अर्थसहाय्य कार्यक्रम पार पाडण्याची पध्दत आणि अशा कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांचे तपशील |
| 14 | 13 | ग्रहीतांना मिळालेली सवलत, परवाने आणि कायदेशीर परवानगी यांचे तपशील |
| 15 | 14 | उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याच्याकडे असलेल्या माहिती संबंधातील तपशील इलेक्ट्रॉनिक रुपात |
| 16 | 15 | ग्रंथालय किंवा वाचनालय सार्वजनिक वापराकरिता असतील तर कामकाजाचे तास व माहिती मिळविण्याकरिता नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधाचे तपशील |
| 17 | 16 | सार्वजनिक माहिती अधिका-याचे नांव, हुद्दा आणि अन्य तपशील |
| 18 | 17 | अशा प्रकारची विहित करावयाची अन्य माहिती |

# प्रास्ताविक

1.1 हया निर्देशपुस्तकाच्या पार्श्वभूमीवरील विशिष्टता कृपया निदर्शनास आणावी (माहितीचा अधिकार अधिनियम 2005)

संसद अंधिनियमानुसार आणि भारताच्या राष्ट्रपतीच्या संमतीनुसार माहितीचे अधिकार अधिनियम 2005, 12 ऑक्टोबर 2005 पासून अंमलात आला.

नागरिकांना शासकीय प्राधिका-यांच्या निमंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत पोहोचण्यास व त्यात पारदर्शकता व जबाबदारीस उत्तेजन देण्याच्यादृष्टीने माहिती मिळण्याच्या अधिकाराची प्रत्यक्ष पध्दत सुरु करणारा अधिनियम म्हणून आता नागरिकांना एखादी माहिती हवी असल्यास आता ती देणे उपयुक्त ठरेल. अशात-हेने महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या नियंत्रणाखाली माहिती मिळविण्याकरिता महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या खात्याने अधिनियमाच्या कंडिका 4(1) (बी) खाली निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रसिध्दी करिता 17 नियमावलीचे हे निर्देश पुस्तक तयार केले आहे.

1.2 हया निर्देश पुस्तकाचे उद्दीष्ट / हेतू

या प्राधिका-याच्या कार्यपध्दतीमधे पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्याच्या दृष्टीकोनातून व या खात्याची माहिती पुरविण्याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 खाली हे निर्देश पुस्तक तयार करण्यात आले आहे.

1.3 हया निर्देश पुस्तकाचा वापर कोण करु शकेल

हे निर्देश पुस्तक नागरिकांच्या वापराकरिता संकलित आणि प्रकाशीत केले आहे.

1.4 हया निर्देश पुस्तकामध्ये असलेल्या संघटनेची माहिती

हे निर्देश पुस्तक आणि त्या मधील माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या खात्याशी संबंधित आहे.

1.5 व्याख्या (निर्देश पुस्तकामध्ये वापरलेल्या विविध संज्ञा यांची कृपया व्याख्या करावी)

हया अहवालामध्ये वापरलेल्या सर्व संज्ञांची योग्यत-हेने व्याख्या केलेली आहे.

1.6 हया निर्देश पुस्तिकेमध्ये समाविष्ट असलेल्या विषयांवर अधिक माहिती तसेच अन्य माहिती कोणाला हवी असेल तर नियमपुस्तिका 16 मध्ये दिलेल्या व्यक्तींशी संपर्क साधावा.

1.7 निर्देश पुस्तिकेमध्ये उपलब्ध नसलेली माहिती मिळविण्यासाठीची पध्दत आणि शुल्क

आकारावयाचे शुल्क प्रती पृष्ठाला रु. दोन अधिक पृष्ठांच्या संख्येवर आधारित डाक नोंदणी आकार.